**एम. जी. एम. अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धांत सुयश**

युनायटेड नेशन्सच्या “फूड अंड अग्रीकल्चर” संघटनेद्वारा सन १९८१ पासून १६ ऑक्टोबर रोजी जगभरात “जागतिक आहार दिन” पाळला जातो. या दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमधील संशोधक वृत्तीचा विकास व्हावा, अन्नप्रक्रीयेस व मूल्यवर्धनास चालना मिळावी म्हणून एम. आई. टी. औरंगाबाद शैक्षणिक संस्थेच्या कृषी अभियांत्रिकी विभागाने दि. १६ ऑक्टोबर २०१८ रोजी आंतरमहाविद्यालयीन बौद्धिक प्रश्नमंजुषा, अन्नपदार्थांचे प्रमाणीकरण व संशोधन इत्यादी स्पर्धांचे आयोजन केले होते. राज्यभरातून सात अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे संघ व विद्यार्थी या स्पर्धांत सहभागी झाले होते.

अन्नपदार्थ प्रमाणीकरण व संशोधन स्पर्धेत एम. जी. एम. अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या अंतिम वर्षात शिकत असलेल्या सौरभ भाटीया आणि स्वप्नील दुधाटे व संघ यांनी अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकावला. बौद्धिक प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम वर्षाची विद्यार्थिनी निधी पटेल व विद्यार्थी सोमिनाथ फाळके यांनी द्वितीय व तृतिय स्थान प्राप्त केले; तर रश्मी इंगळे व निपुण पाटील या विद्यार्थ्यांनी पोष्टर प्रेझेन्टेशन गटात तृतिय पारितोषिक मिळवले. सहभागी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील स्वानुभवातून शिक्षण योजनेचे प्रभारी प्रा. निलेश केलापुरे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे सचिव मा. अन्कुशरावजी कदम, एम. जी. एम. चे कृषि संचालक डॉ. राजेंदर रेड्डी व प्राचार्य डॉ. रविद्र काळे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले.